निशाणी क्र. ३७

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १</u>**

नावः नेमीचंद्र हिरालाल निषाद,

वयः ३२ वर्षे, धंदाः व्यवसाय,

पत्ताः टेभोंडे, पालघर, ता. जि. पालघर.

**<u>अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक अभियोक्ता श्री. पी. आर. ठाकरे यांच्यामार्फत साक्षीदाराचा सरतपास शपथेवर सुरु–</u>**

१. मी आरोपींना ओळखत नाही. दिनांक १३.०९.२०१८ रोजी सायंकाळी ६.४५ वाजता मी माझ्या भावाच्या मुलीच्या मैत्रीणीला टेभोंडे येथे सोडायला मोटारसायकलने जात होतो. त्यावेळी रस्त्याच्या मध्ये दोन जण बसून दारू पित होते. मी गाडीचा हॉर्न वाजविला परंतु ते लोक बाजूला झाले नाही. त्यानंतर मी बाजूने गाडी काढली. त्यावेळी त्या दोघांनी माझ्या गाडीवर बसलेल्या मुलीवर वाईट कमेंट केले. मी लगेचच गाडी थांबवून त्यांना काय बोलले असे विचारले असता ते दोघे दारूच्या नशेत होते. त्यावेळी ते मला म्हणाले की, रुक मै तेरोको बताता. त्यानंतर मी गाडी घेऊन तेथून निघुन गेलो. त्यानंतर मी मुलीला सोडुन परत येत असतांना गाडीवर मी व माझ्या भावाची मुलगी होतो. त्यावेळी त्या दोघांनी माझी मोटारसायकल थांबविली व म्हणाले की, ज्यादा हॉर्न बजाने लगा है क्या, असे बोलून त्यांनी मला फटके मारायला चालू केले. त्यानंतर तेथे अजून दोन तीन लोक आले व त्यांनी तेथून एक हिरवे लाकुड तोडुन आणले. त्यापैकी दोघांनी मला पकडुन ठेवले व बाकीच्यांनी मला लाकडी दांडक्याने पाठीवर, कमरेवर व पायावर मारहाण केली. त्यानंतर माझ्या भावाची मुलगी पळत जाऊन माझ्या मेव्हण्याच्या घरी गेली. त्यानंतर लगेचच माझी पत्नी अनुराथा, मेव्हणा संतोष, आत्याचा मुलगा नरसिंग, खुशबू संतोष गुप्ता व इतर लोक तेथे आले. त्यांनी मला सोडवले. त्यानंतर आरोपींनी संपुर्ण गाव घेऊन आले व आम्हां सर्वांना मारायला चालू केले. त्यांनी आम्हांला दांडयाने, हाताबुक्यांनी मारहाण केली. पंधरा वीस लोकांनी मिळून एका माणसाला मारहाण केली. त्यानंतर आरोपीने पुरी तळण्याच्या झा–याने आमचे नातेवाईक चौरसिया याच्या डोक्यात मारहाण केली. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला गेलो व फिर्याद

नोंदविली. मला आता दाखवलेली फिर्यादी तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि. क्र. ३८** देण्यात येतो. मला आता दाखवलेली छापील खबर तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि. क्र. ३९** देण्यात येतो. मला ज्या लाकडांनी मारहाण झाले ते दाखविल्यास मला ओळखता येणार नाही. घटनेला बरेच वर्ष झाल्याने मला ते ओळखता येणार नाही. आम्हांला ज्या झारीने मारहाण झाली तो मी पाहिल्यास ओळखू शकतो. ती लोखंडी झारी होती. जी. एम. आर. क्र. २२०/२०२५ उघडुन दाखविण्यात आला. ती झारी तिच आहे किंवा कसे मला आठवत नाही. आम्हांला ज्या आरोपींनी मारहाण केली त्यापैकी एक दोन लोकांना मी ओळखू शकतो. आरोपींपैकी अमित बेंदर, प्रज्ञेश माळी यांना मी ओळखतो. ते आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपींतर्फे वकील श्री. डी. पी. भट, यांच्यामार्फत साक्षीदाराचा उलटतपास</u>–**

२. मला थोडे थोडे मराठी लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी जात असतांना आम्ही गाडीवर तिघे जण होतो. पोलीस स्टेशनला गेल्यावर मी पोलीसांना काही सांगितले व त्यांनी ते लिहुन घेतले नाही असे झाले किंवा कसे मला आता आठवत नाही. मी फिर्याद देतेवेळी पोलीसांना मी 'रस्त्याच्या मध्ये दोन जण बसून दारू पित होते. मी गाडीचा हॉर्न वाजविला परंतु ते लोक बाजूला झाले नाही. त्यानंतर मी बाजूने गाडी काढली. त्यावेळी त्या दोघांनी माझ्या गाडीवर बसलेल्या मुलीवर वाईट कमेंट केले. मी लगेचच गाडी थांबवून त्यांना काय बोलले असे विचारले असता ते दोघे दारूच्या नशेत होते. त्यावेळी ते मला म्हणाले की, रुक मै तेरोको बताता' असा मजकूर सांगितला होता. तसा मजकूर फिर्यादीमध्ये का नमूद केला नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. मी फिर्याद देतांना पोलीसांना त्यावेळी त्या दोघांनी माझी मोटारसायकल थांबविली व म्हणाले की, ज्यादा हॉर्न बजाने लगा है क्या, असे बोलून त्यांनी मला फटके मारायला चालू केले. त्यानंतर तेथे अजून दोन तीन लोक आले व त्यांनी तेथून एक हिरवे लाकुड तोडुन आणले. त्यापैकी दोघांनी मला पकडुन ठेवले व बाकीच्यांनी मला लाकडी दांडक्याने पाठीवर, कमरेवर व पायावर मारहाण केली असा मजकूर सांगितला होता. तसे माझ्या फिर्यादीत का नमूद नाही मला सांगता येणार

नाही. साक्षीदार सांगतो की, जी काही घटना झाली ती मी पोलीसांना सांगितली होती.

३. मी फिर्याद देतांना पोलीसांना 'त्यानंतर आरोपींनी संपुर्ण गाव घेऊन आले व आम्हां सर्वांना मारायला चालू केले. त्यांनी आम्हांला दांडयाने, हाताबुक्यांनी मारहाण केली. पंधरा वीस लोकांनी मिळून एका माणसाला मारहाण केली' असा मजकूर सांगितला होता. तसा मजकूर पोलीसांनी लिहिला नाही, कारण मारणा–यातील एक मुलगा नगरसेवकाच्या घरातील होता. त्याबाबत पोलीसांच्या वरिष्ठांना तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मनसेतील सुनिल राऊत हा माझा मित्र आहे. मी फिर्याद देतांना पोलीसांना 'पुरी तळण्याच्या झारीने मारहाण केली' असा मजकूर सांगितला होता. हे म्हणणे खरे नाही की, ६.४५ मिनीटांनी मी टेभोंडेकडे जात असतांना माझे दोन अनोळखी इसमांबरोबर भांडण झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी परत येत असतांना ते दोन व आणखी चार लोकांनी पकडुन मारहाण केली. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या सहा लोकांना त्यापुर्वी कधी पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्या सहा लोकांविरुध्द मी फिर्याद दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या सहा लोकांची नांवे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या लोकांचे वर्णन मी फिर्याद देतांना दिले नव्हते. पोलीसांनी आरोपींची ओळखपरेड घेतली नव्हती.

४. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या आरोपीने कुठे मारले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्या आरोपीने कोणाला मारले हे मला सांगता येणार नाही. फिर्यादीमध्ये आरोपींची नांवे पोलीसांनी लिहिले होते. मी पोलीसांना नांवे सांगितली नव्हती. आरोपींना अटक केल्यावर मला पोलीसांनी बोलाविले नव्हते. घटनेमध्ये मला ज्या पाच लोकांनी मारले ते मला माहिती नाही. साक्षीदार सांगतो की, दोन लोकांना मी ओळखतो. मला आरोपीचे नांवे सांगणा–या इसमाचे नाव मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला मारणा–या लोकांमधुन काही लोक माझ्या चाळीमध्ये राहत होते. आकाश वाढाण नावाच्या व्यक्तिला मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मेव्हण्याचे व माझे आपसात भांडण झाले त्यामुळे मला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, माझा ६.४५ वाजता ज्या लोकांशी वाद झाला ते लोक व परत येतांना मारहाण झाली ते लोक व आरोपींचा काहीही संबंध नाही. मला ज्या मुलाने आरोपींची नांवे सांगितले त्याच्याशी कायम भेट होत असते. हे

म्हणणे खरे आहे की, मी ज्या दोन आरोपींना ओळखतो त्यांची नावे मला माहिती नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेला सर्व मजकूर खोटा सांगितला आहे. ज्या झारीने मारहाण झाली त्याचा रंग कोणता होता हे मला आठवत नाही. पोलीसांनी झारी जप्त केली त्यावेळी मी पाहिली होती. पोलीसांनी झारी घटनास्थळावरून घेतली होती. पोलीसांना झारी मी स्वतः दाखविली होती. पोलीसांनी त्यावेळी माझ्यासमक्ष लिखापडी केली होती. त्यावेळी तेथे माझ्या घरातील सर्व लोक, चौरसिया व पोलीस इ. होते. पोलीसांनी कोणत्या मापाचे लाकुड जप्त केले हे मला सांगता येणार नाही. पोलीस झारी व लाकुड कसे घेऊन गेले हे मला सांगता येणार नाही. पोलीस पंचनाम्यासाठी किती वाजता आले हे मला आठवत नाही. पोलीस घटनेच्या दुस–या दिवशी आले होते. फिर्याद दाखल करण्यासाठी उशिरा लागला कारण पोलीस माझी तक्रार नोंदवून घेत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, माझी व आरोपींची समझोत्याबाबत बातचीत चालू होती.

६. पोलीसांनी जप्त केलेला मुद्देमाल हाच आहे किंवा कसे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला झालेल्या मारहाणीमध्ये न्यायालयात हजर असलेल्या आरोपींचा काही संबंध नाही. साक्षीदार सांगतो की, मी दोन लोकांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी शपथेवर खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

दिनांक २३.०४.२०२६
पालघर.

श्रवणोत्तर स्विकृत
Sd/–
(सुजाता रा. बांदल)
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी,
पालघर.